Lokmat 14/4/2015

Training & Placement cell Lokmat

# वाघ महाविद्यालयात 'एचआर समीट'




क. का. वाघ महाविद्यालयात आयोजित 'एचआर समीट २०१५' कार्यक्रमात मार्गदर्शन करताना शेखर कांबळे. समवेत डॉ. प्रमोद शहाबादकर, समीर बेंद्रे, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, गणेश नारायणन्, डॉ. एस.एस.साने.

नाशिक : क. का. वाघ महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व रोजगार विभागाच्या वतीने 'एचआर समीट २०१५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. औद्योगिक संस्था आणि शिक्षणसंस्था यांच्यातील दरी कशाप्रकारे कमी करता येईल, यावर प्रामुख्याने या कार्यक्रमातून चर्चा करण्यात आली.

टीसीएस, एल अँड टी इन्फोटेक, केपीआयटी, महिंद्रा अँड महिंद्रा, डब्ल्यूएनएस, डाटामॅटिक्स, जेबीएम ऑटो लिमिटेड, फिन आयक्यू, कोर व्हिझ टेक्नॉलॉजीज्, मास्टर मोल्ड्स, सातपुडा इंडस्ट्रीज, महिंद्रा सोना, सीएसआय अशा विविध कंपन्यांच्या व्यवस्थापकांनी यात सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांना अधिकाधिक संधी कशाप्रकारे उपलब्ध करून देता येईल, यावर चर्चा केली. औद्योगिक संस्थांतील व्यवस्थापक व महाविद्यालयातील ६० प्राध्यापकांनी यात सहभाग घेतला होता. यावेळी टीसीएस कंपनीचे शेखर कांबळे यांनी विद्यार्थ्यांमधील तांत्रिक ज्ञान, नीतीमूल्ये, दृष्टिकोन, संवादकौशल्य आदि मूल्ये विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून देण्यासाठी फायदेशीर कसे ठरतात, हे सांगितले. नागपूर येथील प्रेझिस्टंट सिस्टिम्स लिमिटेडचे एचआर समीर बेंद्रे, एल अँड टीचे व्यवसायप्रमुख गणेश नारायणन् अशा आदि ३५ एचआर व्यवस्थापकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी शिक्षणसंस्था आणि कौशल्यविकास यांच्यातील दरी यावर भाष्य केले. प्रशिक्षण व रोजगार विभागप्रमुख डॉ. पी. के. शहाबादकर यांनी आभार मानले. महाविद्यालये आणि औद्योगिक संस्था यांचा दृष्टिकोन जाणून घेण्यास हा कार्यक्रम उपयुक्त ठरला असल्याचे मत यावेळी प्राध्यापकांकडून व्यक्त करण्यात आले. (प्रतिनिधी)

दि. ३/५/१५

सकाळ

# क. का. वाघ महाविद्यालयात शुक्रवारी 'एचआर समीट'

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ७ : येथील क. का. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अॅण्ड रिसर्च सेंटरच्या प्लेसमेंट सेलतर्फे 'एचआर समीट २०१५' होणार आहे. येत्या शुक्रवारी (ता. १०) सकाळी साडेनऊला केमिकल इंजिनिअरिंग विभागातील सभागृहात हा कार्यक्रम होईल.

'इंडस्ट्री आणि इन्स्टिट्यूशन यांच्यातील संवाद' ही यंदाच्या समीटची संकल्पना आहे. याअंतर्गत टीसीएस, एल अॅण्ड टी इन्फोटेक, केपीआयटी, जेएसडब्ल्यू, महिंद्र अॅण्ड महिंद्र, कॉम्प्टन ग्रीव्हज, डब्ल्यूएनएस, डेटामॅट्रिक्स, जेबीएम ऑटो आदी कंपन्यांचे प्रतिनिधी, तसेच पॉलिटेक्निक व अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित राहतील. सकाळी पावणेदहाला टीसीएस कंपनीतील शेखर कांबळे यांच्यासह एल अॅण्ड टी इन्फोटेकचे प्रशांत कर्डीकर, समीर बेंद्रे, सुब्रमण्य देसाई आदी उपस्थित राहणार आहेत.

Training & Placement cell 14/4/2015

**CAMPUS BUZZ**

**HR summit at K K Wagh college**: The training and placement cell of KK Wagh Institute of Engineering Education and Research organized the HR Summit-2015 at the institute's Dr PC Ray Memorial Hall of chemical engineering department. The theme of this HR meet was, "Industry-institute interaction for bridging the gap". The HR summit began with registration in the morning, followed by inauguration by Shekhar Kamble, head, talent acquisition group, TCS-Pune, Sameer Bendre, head, HR department, Persistent Systems Ltd, Nagpur and Ganesh Narayanan, an alumni of KK Wagh College of Engineering, working in L&T Info Tech, Mumbai, as business head. Around 35 HR mangers and CEOs from various industries like TCS, L&T Info Tech, Persistent, KPIT, Mahindra and Mahindra, WNS, Datamatics, JBM Auto Ltd, FIN IQ, Core Biz technologies, Master Moulds, Satpuda Industries, Mahindra Sona, CSI, and around 60 academicians of various colleges managed by KK Wagh Education Society participated in the summit. Kamble delivered the keynote address and said that along with the technical knowledge, attitude, self learning, ethics, team work, global mindset and communication skills are equally important for the students to get campus placements and work successfully in the organizations.

**Mental math workshop at DPS**: A workshop on mental math was conducted at Delhi Public School recently. The session began with a discussion on the difference between arithmetic and mathematics. This was followed by various activities to develop basic math skills like addition and subtraction through interesting worksheets and games like 'palindrome concept' and 'housie'. The first half was conducted by Chitra Balaji. In the second half of the session, Varsha Wadekar introduced the participants to

# वाघ अभियांत्रिकीमध्ये उद्योग परिषद

**नाशिक :** येथील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये येत्या शुक्रवारी 'उद्योग व संस्था यांच्यातील सुसंवाद' याविषयीची एकदिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषद महाविद्यालयाच्या रासायनिक अभियांत्रिकी विभागाच्या डॉ. पी. सी. रॉय सभागृहात सकाळी ९.३० वाजता संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेमध्ये इटीसीएस, एल ॲण्ड टी, पर्सिस्टंट इन्फोटेक, केपीआटी, जेएसडब्ल्यु, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, क्रॉम्प्टन ग्रुप, डब्ल्युएनएस, डाटामॅटिक्स, जेबीएम ऑटो लि. या कंपन्यांचे उद्योग एचआर व्यवस्थापक व एचआर प्रमुख सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत.